


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ३०७ ●शनिवार,दि.०७ फेब्रुवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955






## बीडचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित थेट फिल्डवर

### उन्हाळा व रमजानच्या पार्श्वभुमीवर पाणीपुरवठा योजनांचा घेतला आढावा

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री स्व.अजितदादा पवार यांनी बीडचा पाणीप्रश्न सोडवण्याचा शब्द दिला होता, सर्व यंत्रणांना कामाला लावत बीड नगर पालिकेच्या थकीत विज बिलासाठी मंत्रालयात बैठक बोलावण्यात आली होती. पाणी प्रश्नासह दादांचा बीडच्या विकासाचा वादा राज्याच्या नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजित पवार यांच्या माध्यमातून पूर्ण करून घेण्यासाठी आ. विजयसिंह पंडित थेट फिल्डवर उतरले आहेत. बीड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या माजलगाव येथील बॅक वॉटर काडीवडगाव आणि ईट येथील जलशुध्दीकरण केंद्राची त्यांनी पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अभियंता तुषार टेकावडे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे, उपनगराध्यक्ष तथा पाणीपुरवठा सभापती विनोद मुळूक, गटनेते फारुक पटेल, सभापती शेख निजाम, संपादक शेख मुजीब यांची उपस्थिती होती. शुक्रवार, दि.६ फेब्रुवारी रोजी आ. विजयसिंह पंडित यांनी बीड शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी माजलगाव बॅक वॉटर काडीवडगाव आणि ईट येथील जलशुध्दीकरण केंद्राची पाहणी केली. या पाहणीत योजनेच्या पाईपलाईनवर पाणी गळती, पाणी वितरणातील अवमेळ, फिल्डवरील बिघाड याकडे झालेले दुर्लक्ष आणि तांत्रिक चुका अशा धक्कादायक बाबी यावेळी समोर आल्या. या सर्वांचा बीड शहराच्या पाणीपुरवठ्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे. माजलगावच्या काडीवडगाव येथील बॅकवॉटरवरून ३६ एमएलटी पाणी प्रत्यक्षात उचलण्यात येत असले तरी मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या पाणी गळतीमुळे ईटच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

**● नागरीकांचे प्रश्न सोडविण्यासाठी नगरसेवकांचा पुढाकार**

शिव–शाहू–फुले–आंबेडकर–मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीचे सर्व नगरसेवक शहरातील नागरीकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली क्टिव असल्याचे दिसून येत आहे. शहरातील रस्ते, नाली, स्वच्छता, पाणी प्रश्न, विद्युत पुरवठा आदी मुलभूत प्रश्न सोडवण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्यासह नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, सभापती व सर्व नगरसेवक उपलब्ध होत असून बीड नगर परिषदेत सत्ता परिवर्तन झाल्यानंतर अवघ्या काही दिवसातच शहरवासियांचे मुलभूत प्रश्न मार्गी लागत असल्यामुळे नागरीकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.



**● शहरात बदल होतोय**

बीड नगर परिषदमध्ये स्व. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन बीड शहरातील जनतेने परिवर्तन केले. नगर परिषदेची सत्ता हाती आल्यानंतर आ. विजयसिंह पंडित हे आपल्या नगरसेवकांसह शहरातील विविध ठिकाणी भेटी देऊन जनतेशी संवाद साधत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली शहरातील विविध प्रश्न निकाली निघत आहेत. स्वच्छतेसाठी घंटागाड्या, पाणी पुरवठा यांसह विविध मुलभूत प्रश्न मार्गी लागत असल्याने बीड शहरामध्ये बदल होत असल्याची चर्चा नागरीकांमधून केली जात आहे.

## 'अंबाजोगाई ग्रासलॅंड सफारी'चा शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

बीड वन विभागांतर्गत वनपरिक्षेत्र कार्यालय परळी मध्ये जैवविविधता संवर्धन व रोजगार निर्मिती या उद्देशाच्या अनुषंगाने अंबाजोगाई शहरालगत असलेल्या वन विभागाच्या डोंगराळ, खुरट्या व गवताळ वनक्षेत्रात अंबाजोगाई ग्रॅसलॅंड सफारी या उपक्रमाची दिनांक २६. १. २०२६ रोजी विधानसभेच्या सदस्या नमिता मुंदडा अंबाजोगाई, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अंबाजोगाई नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, विभागीय वनाधिकारी



अमोल गरकळ, विभागीय अधिकारी सामाजिक वनीकरण श्रीनिवास लखमावार, अंबाजोगाई उपविभागीय अधिकारी दीपक वांजळे, अंबाजोगाई तहसीलदार विलास तरांगे यांच्या हस्ते शुभारंभ झाला. यावेळी वनक्षेत्रात महात्मा गांधी प्राणी संग्रहालय सोलापूर येथील ३३ काळवीट जातीच्या हरणास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. परळी वनपरिक्षेत्रा अंतर्गत अंबाजोगाई शहरालगत वन विभागाचे एकूण १३२८.०६ हे.आर सलग राखीव नक्षत्र आहे. सदरचे क्षेत्र हे डोंगराळ खुरट्या व गवताळ प्रकारचे आहे यामध्ये विविध प्रकारचे वन्यप्राणी जसे की हरिण, लांडगा, कोल्हा, बीबट, तडस इत्यादी प्राण्यांचा तसेच विविध प्रकारच्या पक्षांचा अधिवास मोठ्या प्रमाणावर आहे. तसेच या क्षेत्रामधून वाणा नदीचा प्रवाह ▶▶ उर्वरित पान २ वर

## गुजरात मध्ये हाय प्रोफाईल पार्टी मधील महिलाना पोलिसानी घेतले ताब्यात

गुजरात मध्ये हाय प्रोफाईल पार्टी मधील महिलाना पोलिसानी घेतले ताब्यात

**अहमदाबाद**

'ड्राय स्टेट' असलेल्या गुजरातमध्ये कायद्याची ऐशीतैशी करत सुरू असलेल्या एका हायप्रोफाईल मद्य पार्टीचा पोलिसांनी थरारक पद्धतीने पर्दाफाश केला आहे. अहमदाबादच्या सानंद परिसरातील 'सफल निर्वाण ग्रीन्स' या आलिशान व्हिलामध्ये

**अहमदाबादमध्ये हायप्रोफाईल मद्य पार्टीवर पोलिसांचा सर्जिकल स्ट्राईक! २५ व्या वाढदिवसाचा रंग झाला बेरंग; २.३ कोटींचा ऐवज जप्त**



बुधवारी मध्यरात्री पोलिसांनी धाड टाकली. या कारवाईत ४३ बड्या धेंडांना बेड्या ठोकण्यात आल्या असून ३८ महिलांना ताब्यात घेण्यात आले आहे.

लग्नाचा वाढदिवस अन् दारूचा महापूर- मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील एका व्यक्तीच्या मेव्हण्याच्या लग्नाच्या २५ व्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक शवगृह सुरू करा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक शवगृह तातडीने सुरू करण्यात यावे, अशी ठाम मागणी मिलिंद सरपते, सामाजिक कार्यकर्ते तथा वंचित बहुजन आघाडी, बीड शहराचे नेते यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. जिल्हा रुग्णालय हे संपूर्ण जिल्ह्याचे प्रमुख शासकीय आरोग्य केंद्र असून दररोज मोठ्या प्रमाणावर रुग्णसेवा दिली जाते. मात्र सध्या असलेली शवागार व्यवस्था अपुरी, कालबाह्य व आधुनिक सुविधांअभावी गैरसोयीची ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मृतदेह सन्मानपूर्वक ठेवण्यासाठी आवश्यक तापमान नियंत्रण, स्वच्छता, पुरेशी साठवण क्षमता तसेच नातेवाईकांसाठी मूलभूत सोयीसुविधांचा अभाव असल्याने हा प्रश्न केवळ प्रशासकीय नसून मानवी ▶▶ उर्वरित पान २ वर

## अनुदान वाटपात वडवणी तालुक्यात साडेतीन कोटींचा घोटाळा?

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील शेत पिक नुकसान वाटपाच्या याद्याची तपासणी करिता पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली चौकशी समिती नेमली आहे. हि चौकशी समिती गेल्या महिन्यात वडवणी तहसिल कार्यालयात दाखल झाली परंतु या चौकशी समोर तलाठ्यासह इतर कर्मचारी उपस्थित राहिलेले नाहीत. या प्रकारामुळे वडवणी तालुक्यात शेती अनुदानात घोळ असल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. तर सूत्रांच्या माहितीनुसार, तब्बल साडेतीन कोटी रुपये पेक्षा जास्त रक्कम हडपल्याची माहिती मिळाली आहे. तरी याप्रकरणी वडवणीचे तहसीलदार ▶▶ उर्वरित पान २ वर

**● जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पत्रात**

ग्राम महसूल अधिकारी व इतर संबंधित कर्मचारी यांचे म्हणणे ऐकून घेवून आपला स्वयंस्पष्ट निष्कर्षासह परिपूर्ण अंतिम वस्तूस्थितीदर्शक अहवाल तात्काळ सादर करावा. अहवाल तातडीने सादर न झाल्यास उपविभागीय अधिकारी यांनी दिलेला अहवाल अंतिम अहवाल आहे असे समजून शासनास सादर करण्यात येईल. त्यानंतर होणाऱ्या परिणामास व झालेल्या हलगर्जीपणास ते स्वत: जबाबदार राहतील असा स्पष्ट उल्लेख पत्रात करण्यात आला आहे.

## अनेक वर्षांपासून दसऱ्याला मिळणारा आशीर्वाद आज हरपला: माजी मंत्री धनंजय मुंडे

### जगतकर परिवाराचे मुंडे यांच्याकडून सांत्वन



**परळी वै. । प्रतिनिधी**

जगतकर कुटुंबीयांना सांत्वन भेट देण्यासाठी आलेले माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी भावूक होताना वरील उद्गार काढले. आपल्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या सुख-दु:खात सहभागी होण्याची परंपरा आमदार मुंडे यांनी अनेक वर्षांपासून जपली आहे. वैद्यनाथ बँकेचे संचालक तसेच महिला महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. विनोद जगतकर यांच्या मातोश्रींचे मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी दु:खद निधन झाले होते. आपल्या अत्यंत निकटवर्तीय सहकारी मित्राच्या दु:खात धीर देण्यासाठी आमदार मुंडे यांनी आज जगतकर कुटुंबीयांची भेट घेतली. दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी जगतकर कुटुंबीयांच्या घरी भेट दिल्यानंतर ते मातोश्रींचे आवर्जून दर्शन घेत असत. आज त्या आठवणीने ते विशेष भावूक झाले. यावेळी त्यांनी कुटुंबीयांसह सर्व नातेवाईक व आप्तेष्टांचीही आवर्जून भेट घेत सांत्वन केले.

## रेल्वे प्रकल्प पुर्ण करण्यावर खा.बजरंग सोनवणेंचा फोकस; केंद्रीय रेल्वेमंत्र्यांची घेतली भेट

### मराठवाड्यातील रखडलेले रेल्वे प्रकल्प मार्गी लावण्याची मागणी, रेल्वेमंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद

**नवी दिल्ली**

बीड लोकसभा मतदार संघासह संपूर्ण मराठवाडा विभागातील रखडलेले व अत्यावश्यक रेल्वे प्रकल्प पुर्ण करून घेण्यावर खा.बजरंग सोनवणे यांनी फोकस केला आहे. रखडलेल्या रल्वेमार्गाचे काम मार्गी लावण्यासाठी संसद भवन, नवी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वे, संचार व इलेक्ट्रॉनिक्स मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन खा.बजरंग सोनवणे यांनी सविस्तर चर्चा केली. या बैठकीत मराठवाड्याच्या दळणवळण विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाचे विषय मांडण्यात आले.

यावेळी मराठवाड्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या धाराशिव-बीड- छत्रपती संभाजीनगर या नवीन रेल्वेमार्गाचा मुद्दा बैठकीत अग्रक्रमाने मांडण्यात आला. मार्च २०२५ मध्ये या ▶▶ उर्वरित पान २ वर



**● इंटरसिटी सेवांबाबत चर्चा**

विद्यार्थी, रुग्ण, व्यापारी तसेच नोकरदार वर्गाची वाढती गरज लक्षात घेता बीड-अहिल्यानगर-मुंबई व बीड-अहिल्यानगर-पुणे या मार्गांवर दररोज धावणाऱ्या इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या सेवांमुळे मराठवाड्याचा संपर्क थेट राज्याच्या प्रमुख शहरांशी मजबूत होणार असल्याचे सांगण्यात आले. या विषयावर सखोल चर्चा झाली.

**● बार्शी नाका येथे नवीन रेल्वे स्टेशनची मागणी**

पूर्व बीड शहर तसेच ग्रामीण भागातील नागरिकांसाठी बार्शी नाका (बीड) परिसरात सुलभ ठिकाणी नवीन रेल्वे स्टेशन उभारण्याची गरज आहे, शिवाय नागरिकांची तशी मागणी देखील असल्याचे खा.सोनवणे यांनी केंद्रीय मंत्र्यांना सांगितले. या रेल्वे स्थानकामुळे प्रवास अधिक सोयीस्कर होऊन बीड शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**● रेल्वे मार्गावर ब्रिजची गरज**

अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गावर अनेक ठिकाणी रेल्वे गेटमुळे सतत वाहतूक कोंडी होत असून अपघातांचाही धोका वाढला आहे. हा धोका कमी करण्यासाठी संबंधित ठिकाणी रोड ओव्हर ब्रिज व फूट ओव्हर ब्रिज उभारण्याची मागणी रेल्वेमंत्र्यांसमोर मांडण्यात आली.

**● मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी रेल्वे महत्वाची आहे.** तर बीड जिल्ह्यातील नागरिकांचे रेल्वेचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी रेल्वे सुविधा वाढवण्याबाबत मी सातत्याने पाठपुरावा करत आहे. रेल्वेसाठी जे जे करावे लागेत, ते मी करेल आणि बीडचा रेल्वेचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करत राहणार आहे. -खा.बजरंग सोनवणे, लोकसभा सदस्य, बीड.



# रमाबाई आंबेडकरांचे सामाजिक परिवर्तनाच्या पायाभरणीतील योगदान

७ फेब्रुवारी हा दिवस भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत अर्थपूर्ण, संवेदनशील आणि प्रेरणादायी ठरतो. हा दिवस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनसाथी, त्यागमूर्ती, संघर्षशील आणि मौनात राहूनही सामाजिक क्रांतीची मशाल पेटती ठेवणाऱ्या रमाबाई भिमराव आंबेडकर यांचा जयंती दिन होय. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय विषमता, सामाजिक अन्याय, स्त्रीदमन, आर्थिक दारिद्र्य आणि मानसिक गुलामगिरीच्या पार्श्वभूमीवर रमाबाईंचे जीवन केवळ एका महापुरुषाच्या पत्नीचे जीवन नव्हते. ते जीवन एका स्वतंत्र सामाजिक योद्ध्याचे, अपार सहनशीलतेचे, निःस्वार्थ त्यागाचे आणि मौनातून घडलेल्या क्रांतीचे जिवंत प्रतीक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक, शैक्षणिक आणि राजकीय संघर्षामागे रमाबाईंच्या कष्टांची, वेदनांची आणि शांत पाठबळाची भक्कम भिंत उभी होती, हे वास्तव समजून घेतल्याशिवाय आंबेडकरी चळवळीचे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही.

रमाबाई आंबेडकर यांचा जन्म अत्यंत साध्या, उपेक्षित आणि सामाजिकदृष्ट्या वंचित परिस्थितीत झाला. त्या काळातील दलित समाजाचे जीवन म्हणजे अपमान, अस्पृश्यता, दारिद्र्य, बहिष्कार आणि सततची असुरक्षितता यांचा संगम होता. स्त्री म्हणून जन्माला येणे म्हणजे दुहेरी अन्याय सहन करणे, हीच त्या समाजाची वास्तवता होती. शिक्षण, स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, आरोग्य आणि आत्मसन्मान या मूलभूत हक्कांपासून स्त्रीला वंचित ठेवणारी सामाजिक रचना रमाबाईंच्या आयुष्यावरही खोलवर परिणाम करत होती. बालपणापासूनच कष्ट, काम, जबाबदाऱ्या आणि मौनातील सहनशीलता हेच त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले. लहान वयातच जीवनातील कठोर वास्तव स्वीकारावे लागल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व संयमी, सहनशील आणि आत्मसंयमी बनले.

अत्यंत लहान वयात रमाबाईंचा विवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील कौटुंबिक नाते नव्हते, तर तो एका व्यापक सामाजिक संघर्षाचा प्रारंभ होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य शिक्षण, विचार, आंदोलन, संघर्ष आणि सामाजिक विरोधाने भरलेले होते. या संघर्षांचा



भार रमाबाईंनाही समानतेने पेलावा लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि समाजसुधारणेसाठी सातत्याने व्यग्र असताना रमाबाई घर, कुटुंब, मुले आणि सामाजिक वास्तव यांचा समतोल राखत होत्या. संसार सांभाळताना त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही, उलट त्या ध्येयांवर त्यांनी अढळ विश्वास ठेवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण भारताबाहेर सुरू असताना रमाबाईंवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली. आर्थिक टंचाई, अन्न-वस्त्राचा अभाव, आजारपण, सामाजिक उपेक्षा आणि मानसिक ताण हे त्यांचे रोजचे वास्तव होते. अनेक वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागले, साध्या वस्त्रांवर समाधान मानावे लागले. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, हीच त्यांची ठाम भूमिका होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचनी मिळवलेले ज्ञान हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठी आहे, याची रमाबाईंना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या वेदनांवर मौन धारण करून सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाला बळ दिले.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील सर्वांत वेदनादायी आणि हृदयद्रावक अध्याय म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन होय. मातृत्वाचा आनंद अनुभवण्याआधीच त्यांना असह्य दुःख सहन करावे लागले. एका मागोमाग एक अपत्य गमावणे ही कोणत्याही आईसाठी अकल्पनीय वेदना असते. रमाबाईंच्या आयुष्यात ही वेदना वारंवार आली. तरीही त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. स्वतःच्या दुःखाला बाजूला ठेवून समाजासाठी झटणाऱ्या पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हेच त्यांनी आपले जीवनधर्म मानले. रमाबाईंचा हा त्याग भारतीय स्त्रीच्या सहनशीलतेचा, मानसिक बळाचा आणि निस्वार्थ प्रेमाचा सर्वोच्च नमुना आहे.

रमाबाई आंबेडकर या जरी प्रत्यक्ष सामाजिक आंदोलनांच्या मंचावर दिसत नसल्या, तरी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे, मूलभूत आणि निर्णायक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना स्थैर्य देणारे, त्यांच्या संघर्षाला मानसिक आधार देणारे आणि त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळात खंबीरपणे साथ देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रमाबाई आंबेडकर होत्या. अस्पृश्यता निवारण, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, धर्मांतर चळवळ आणि भारतीय संविधाननिर्मिती यांसारख्या ऐतिहासिक कार्यांसाठी बाबासाहेबांना जे मानसिक बळ आवश्यक होते, ते रमाबाईंच्या निस्वार्थ त्यागातून मिळाले.

रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत, संयमी आणि आत्मसन्मानाने भरलेले होते. प्रसिद्धी, सन्मान, मान्यता किंवा सार्वजनिक गौरवाची अपेक्षा त्यांनी कधीच ठेवली नाही. समाजाने अनेकदा त्यांच्याकडे केवळ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्नी' म्हणून पाहिले, परंतु प्रत्यक्षात त्या एका स्वतंत्र विचारसरणीच्या, मूल्यनिष्ठ आणि आत्मसन्मान जपणाऱ्या स्त्री होत्या. अपमान, दुर्लक्ष, अवहेलना आणि कष्ट सहन करूनही त्यांनी कधी तक्रार केली नाही. त्यांचे मौन हे कमजोरीचे नव्हे, तर अंतर्गत शक्तीचे, संयमाचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक होते.

भारतीय समाजातील स्त्री-पुरुष समानतेच्या चर्चेत रमाबाई आंबेडकर यांचे जीवन अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यांनी स्त्रीवादावर भाषणे केली नाहीत, लेखन केले नाही, परंतु त्यांच्या जीवनाने स्त्रीच्या सामाजिक भूमिकेची नवी व्याख्या केली. शिक्षणापासून वंचित असूनही त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक ध्येयांना त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून ती सामाजिक परिवर्तनाची शांत पण प्रभावी वाहक असते.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील दारिद्र्य हे केवळ आर्थिक नव्हते, तर ते सामाजिक अन्यायाचे आणि संरचनात्मक विषमतेचे प्रतीक होते. जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, धार्मिक रूढी आणि स्त्री म्हणून दुय्यम स्थान या सगळ्यांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर झाला. तरीही त्यांनी परिस्थितीला दोष देत बसण्याऐवजी आशेचा मार्ग स्वीकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर, मूल्यांवर आणि ध्येयांवर ठेवलेला विश्वास हेच त्यांच्या जगण्याचे बळ होते. त्यांच्या जीवनातून हे अधोरेखित होते की सामाजिक परिवर्तनासाठी फक्त पुढे उभे राहणारे नेतेच नव्हे, तर मागे उभे राहून आधार देणारे व्यक्तिमत्त्वही तितकेच महत्त्वाचे असते.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन स्त्रीवादाचा अप्रत्यक्ष पण प्रभावी आधारस्तंभ आहे. त्यांनी शब्दांतून स्त्रीवाद मांडला नाही, परंतु त्यांच्या जीवनप्रवासाने स्त्रीच्या दुहेरी संघर्षाचे वास्तव जगासमोर ठेवले. जातीय अन्याय आणि पितृसत्ताक व्यवस्था या दोन्हींचा सामना करत त्यांनी आपले जीवन जगले. आजच्या स्त्री-अभ्यासात रमाबाईंच्या जीवनाकडे केवळ सहनशीलतेचे प्रतीक म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत मोलाचे योगदान देणाऱ्या स्त्री म्हणून पाहिले जाणे आवश्यक आहे.

आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे स्मरण केवळ औपचारिक जयंतीपुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास करताना स्त्री-संघर्ष, दलित प्रश्न, कुटुंबातील त्याग, मानसिक सहनशीलता, भावनिक श्रम आणि सामाजिक परिवर्तनातील अदृश्य योगदान या सर्व पैलूंवर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. रमाबाईंच्या जीवनकथेचा समावेश शिक्षणक्रमात, सामाजिक चर्चेत, स्त्री-अभ्यासात आणि दलित साहित्याच्या अभ्यासात होणे ही काळाची गरज आहे.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजाच्या वास्तवाचे आरसेपण आहे. त्या समाजाच्या कडेला उभ्या राहिलेल्या, पण परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेल्या स्त्रीचे प्रतीक आहेत. त्यांनी कधीही स्वतःसाठी इतिहास लिहिला नाही, परंतु त्यांच्या त्यागाने इतिहास घडविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्यामागील अदृश्य शक्ती म्हणून रमाबाईंचे स्थान अढळ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना त्यांच्या मूल्यांना आत्मसात करणे, हेच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य ठरेल.

रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिवादन न करता त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आजच्या सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पाहिले पाहिजे. स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय, मानवी मूल्यांची जोपासना, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या अंमलबजावणीसाठी रमाबाईंचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांचे मौन आजही आपल्याशी बोलते, त्यांचा त्याग आजही समाजाला प्रश्न विचारतो आणि त्यांचे जीवन आजही परिवर्तनाची प्रेरणा देते. म्हणूनच रमाबाई भिमराव आंबेडकर या केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणाऱ्या विचारांची अखंड साक्ष आहेत.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**

◆ पान ४ वरून पुढे...

## येडेश्वरी कारखाना....

लोकार्पण करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.अजित पवार यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास घेतला होता. मात्र दादा आपल्यातून गेल्याने जिल्हा पुन्हा एकदा पोरका झाला असून, हे बीडचे दुर्दैव आहे. त्यांचे सामाजिक कार्य अतिशय व्यापक होते, असेही सोनवणे यांनी नमूद केले.

## सरपंच पतीने....

पंचायत समिती व संबंधित यंत्रणांनी तात्काळ दखल घेऊन करवाई करणार का ? असा प्रश्न गावाकऱ्यांना पडला आहे. गावकऱ्यांना त्वरित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

## तलाव भरलेला...

कारभारावर तीव्र संताप व्यक्त होत आहे.महिला,वृद्ध व लहान मुलांना पाण्याअभावी त्रास सहन करावा लागत असून नागरिकांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. हे अपयश नाही, तर नागरिकांवर लादलेली जबरदस्ती आहे, असा घणाघाती आरोप सामाजिक कार्यकर्त्या निलाताई पोकळे यांनी केला आहे. तात्काळ नियमित पाटोदा नगरपंचातने पाणीपुरवठा सुरू न केल्यास पाटोदा नगरपंचायतीसमोर आंदोलन करण्यात येईल असा इशाराही सामाजिक कार्यकर्त्या निलाताई पोकळे यांनी देण्यात आला आहे.

## दिवसा घरफोडी....

दि. ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदर गुन्हा हा भगवान ईश्वर भोसले व त्याचा भाऊ कु-या ईश्वर भोसले (रा. बेलगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर, ह.मु. नागझरी, ता. गेवराई, जि. बीड) यांनी मिळून केला आहे. यापैकी भगवान ईश्वर भोसले हा नागझरी येथे आल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नागझरी येथे छापा टाकला असता आरोपी भगवान ईश्वर भोसले हा झाडाखाली बसलेला आढळून आला. त्यास ताब्यात घेऊन विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने पोस्टे पिंपळनेर गु.र.नं. ०८/२०२६ तसेच पोस्टे आष्टी गु.र.नं. १६/२०२६ अन्वये कलम ३०५, ३३१(३) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीस पुढील तपासासाठी पोलीस ठाणे पिंपळनेर यांच्या ताब्यात देण्यात आले असून, या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे पिंपळनेर करीत आहेत. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक व मा. अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि खटावकर, तसेच पोह/अशोक दुबाले, पोह/सोमनाथ गायकवाड, पोह/बाळू सानप, पोह/विकास राठोड, पोह/अंकुश वरपे, पोअ/अर्जुन यादव, पोअ/२२१० अशफाक सय्यद, पोअ/मनोज परजणे व चापोअ/सिद्धेश्वर मांजरे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## सहयोग नगरच्या संत...

लाभ घेत आहेत. गुरुवार दि. ५ फेब्रुवारी रोजी केशव शंखनाद पथक, पुणे यांच्या वतीने शंखनाद व विशेष सेवा सादर करण्यात आली. या कार्यक्रमाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी प्रगट दिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यावेळी महारुद्र अभिषेक, महापूजा तसेच भाविकांसाठी महापंगतीचे आयोजन करण्यात आले आहे. भक्तांच्या सहकार्य व देणगीतून मंदिराचा मोठ्या प्रमाणात जीर्णोद्धार करण्यात आला असून मंदिर अधिक सुंदर व आकर्षक स्वरूपात उभे राहत आहे. या सर्व कार्यक्रमांमुळे सहयोग नगर परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला असून भाविकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

## अनिलदादांच्या चंपावती...

सुरु राहील, असे सांगत हा महोत्सव दरवर्षी नवनवे विक्रम प्रस्थापित करत असल्याचे नमूद केले. त्यामुळे केवळ बीडच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात या महोत्सवाची ओळख निर्माण झाली आहे. उपनेत्या संगीताताई ठोंबरे यांनी चंपावती महोत्सव बीड जिल्ह्यासाठी एक सांस्कृतिक पर्वणी ठरत असल्याचे सांगत शुभेच्छा दिल्या. दै. संकेतचे संपादक नरेंद्र कांक्रिया यांनी कलेला व्यासपीठ देणारा व बाल कलाकारांना ओळख मिळवून देणारा चंपावती महोत्सव अखंडपणे सुरु राहावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले. कलेचे संस्कार घडवणारा चंपावती महोत्सव कधीही बंद पडू दिला जाणार नाही, असे ठाम आश्वासन जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी शेवटी दिले.

◆ पान ९ वरून पुढे...

## बीडचा पाणीपुरवठा....

जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत हे पाणी पोहोचत नाही. ही अशीच गळती जलशुध्दीकरण केंद्रावरही होत असल्याचे निदर्शनास आल्याने याचा बीड शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे दिसताच आ. विजयसिंह पंडित यांनी भविष्यातील उन्हाळी परिस्थिती, रजमान व इतर सण लक्षात घेता तातडीने उपलब्ध साधन सामग्रीचा व यंत्रणेचा वापर करून बीड शहराला पाणीपुरवठा सुरळीत करण्या बाबतच्या सूचना पालिका प्रशासन, पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दिल्या आहेत. यावेळी पाणीपुरवठा अभियंता माने, विद्युत विभागाचे विजय गाडेकर, उदय ईपिल्ला, एम.जी. पठाण, दत्ता व्यवहारे, एम.बी. सानप, रशिद सय्यद यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## 'अंबाजोगाई ग्रासलॅड....

वाहत असल्यामुळे वन्य प्राणी व पक्षांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था या ठिकाणी आहे. तसेच अंबाजोगाईच्या मुकुंदराज परिसराला निसर्गाची देण आहे. दऱ्या- खोऱ्याने नटलेल्या या परिसरात निसर्ग सौंदर्याचे वैभव दाटलेले आहे. त्यात वनराई फुलण्याची गरज आहे. या परिसराला ऐतिहासिक महत्त्व असून सदरचे ठिकाण हे पर्यटनाच्या दृष्टीने योग्य असल्याने निसर्गरम्य परिसरात पर्यटनाच्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून या ठिकाणी ३३ काळवीट ३३ काळवीट जातीच्या हरणास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले आहे. सदरच्या ग्रॅसलँड सफारीचा प्रकल्प मराठवाड्यासारख्या डोंगराळ भागात पहिलाच प्रयोग असून या प्रकल्पातुन जैवविविधतता वाढवणे तसेच वनाचे संरक्षण व संवर्धन करण्याचा हेतू आहे. सदर प्रकल्प राबवल्यामुळे प्रकल्प क्षेत्रामध्ये विविध गवत प्रजातीची लागवड करून त्या ठिकाणी वन्य प्राण्यांना पानवठे निर्माण करण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे जंगलातील प्राणी जंगलातच राहतील आणि पर्यायाने जंगल शेजारील शेतकऱ्याच्या शेतातील पिकांचे वन्यप्राण्यामुळे नुकसान होणार नाही. तसेच या क्षेत्रालगत मराठीचे आद्यकवी स्वामी मुकुंदराजांचे समाधी मंदिर, जोगेश्वरी देवीचे मंदिर, संत दासोपंत यांची समाधी, बुट्टेनाथ मंदिर, किरमानी दर्गा, मौलाली दर्गा, हत्तीखाना, बाराखांबी मंदिर लेणी, आकर्षक नृत्य असलेले संकलेश्वर मंदिर, जैन लेण्या तसेच परळी येथे बारा ज्योतिर्लिंग पैकी असलेले प्रभू श्री वैद्यनाथ महादेवाचे मंदिर इत्यादी धार्मिक तसेच ऐतिहासिक मंदिर व वास्तू असल्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटक व भाविकांची संख्या अधिक असल्यामुळे या सफारीचा निश्चितच पर्यटकांना लाभ होईल तसेच स्थानिक लोकांना यापासून रोजगार निर्मिती सुध्दा होईल असे विभागीय वन अधिकारी (प्रा.) बीड यांनी नमूद केले आहे.

## गुजरात मध्ये...

वाढदिवसाचे निमित्त साधून या जंगी पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. रात्री साडेबाराच्या सुमारास जेव्हा संगीताच्या तालावर मद्यधुंद होऊन पाहुणे नाचत होते, तेव्हाच पोलिसांनी अचानक एन्ट्री घेतली. गुजरातमध्ये दारूबंदी असतानाही या पार्टीत मद्याचे कारंजे वाहत होते, ज्यामुळे पोलिसांच्या कारवाईने एकच खळबळ उडाली. करोडोंचा मुद्देमाल आणि लक्झरी गाड्या जप्त- पोलिसांनी केवळ अटकच केली नाही, तर घटनास्थळावरून जप्त केलेल्या साहित्याचा आकडा पाहून सर्वांचे डोळे विस्फारले आहेत. तब्बल २.३ कोटी रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. यामध्ये २२ आलिशान कार, ७४ महागडे मोबाईल फोन, १० हुक्के आणि १५ विदेशी मद्याच्या बाटल्यांचा समावेश आहे. जप्त केलेल्या गाड्यांच्या रांगा पाहून ही पार्टी किती हायप्रोफाईल होती याची प्रचिती येते. आता 'ड्रग्ज'च्या अँगलने तपास सुरू- अहमदाबाद ग्रामीणचे पोलीस अधीक्षक ओम प्रकाश जाट यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून कडक पावले उचलली आहेत. पार्टीत केवळ दारूच होती की अंमली पदार्थांचेही सेवन झाले, हे तपासण्यासाठी सर्व ८१ जणांच्या रक्ताचे नमुने न्यायवैद्यक प्रयोगशाळेत (FSL) पाठवण्यात आले आहेत. जर रक्ताच्या नमुन्यात अमली पदार्थांचे अंश आढळले, तर या सर्वांवर 'NDPS' कायद्यानुसार अधिक कठोर कारवाई केली जाणार आहे. सध्या गुजरातमध्ये या कारवाईची मोठी चर्चा सुरू असून, दारूबंदीच्या राज्यात हे मद्य आले कुठून आणि यामागे मोठे रॅकेट आहे का, याचा शोध आता पोलीस घेत आहेत.

## जिल्हा रुग्णालयात...

सन्मान व सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर विषय असल्याचे मिलिंद सरपते यांनी स्पष्ट केले. या निवेदनाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड,तसेच जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांनाही देण्यात आली असून तातडीने ठोस कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. याप्रकरणी जिल्हा प्रशासन काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अनुदान वाटपात...

यांना विचारले असता चौकशी सुरू आहे, असे सांगितले.
बीड जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरीय शेतपिक अनुदानाच्या याद्या तपासणीसाठी घेतले आहेत. तर याप्रकरणी वडवणी तालुक्यातील गेल्या पाच वर्षातील शेतपीक अनुदान वाटपाच्या याद्या तपासणीसाठी पाटोदा येथील उपविभागीय अधिकाऱ्यासह इतर अधिकारी चौकशीसाठी नेमले आहेत. ही चौकशी समिती गेल्या महिन्यात वडवणी तहसिल कार्यालयात हजर झाली. परंतु या चौकशी समोर एकही तलाठी किंवा इतर कर्मचारी उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे वडवणी तालुक्यात मोठ्या संख्येने याद्यांमध्ये तफावत असून कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. तर सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वडवणी तालुक्यात पीक नुकसानीच्या अनुदान वाटपाच्या यादीत जवळपास साडेतीन कोटीपेक्षा अधिक रक्कम असण्याची शक्यता वर्तवली आहे. तर याप्रकरणात अनेक जण आहेत. संपूर्ण चौकशी केली तर दुध का दुध और पाणी का पाणी होईल. तर याबाबत काल वडवणीचे तहसीलदार वैभव महेंद्रकर यांच्याशी सक्षम भेट घेऊन विचारणा केली असता, त्यांनी याबाबत माहिती न देण्याचा प्रयत्न केला. परंतु म्हणाले की, याबाबत पाटोदा उपविभागीय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली चौकशी समिती नेमली आहे. चौकशी सुरू आहे. गेल्या महिन्यातच ही चौकशी आली होती. याविषयी माहिती घेणे सुरू आहे. काहींची बँक खाते होल्ड करत वसुली देखील सुरु केली आहे. तर याबाबत तात्कालीन तलाठी कोण होते ? याची माहिती घेणे बाकी आहे. त्यांना नोटीस पाठवाव्या लागतील ? बाकी चौकशी समिती निर्णय घेईलच अशी प्रतिक्रिया तहसीलदार यांनी दिली आहे. तर याबाबत दि.२ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयने सर्व तहसीलदारांना पत्र काढून गंभीर इशारा देखील दिला आहे.

## रेल्वे प्रकल्प...

प्रकल्पाच्या सर्वेक्षणासाठी ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल रेल्वेमंत्र्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. या प्रकल्पाचा डीपीआर तातडीने पूर्ण करून प्रशासकीय मान्यता देत प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, घाटनांदूर रेल्वे स्टेशन व परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी काही महत्त्वाच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणी पुन्हा मांडण्यात आली. यामध्ये औरंगाबाद-गुंटूर, बेंगळुरू-नांदेड, नांदेड-पनवेल या गाड्यांचा समावेश असून, कोविडपूर्वी असलेले थांबे पुन्हा सुरू करावेत, अशी मागणीही करण्यात आली. या सर्व विषयांवर अश्विनी वैष्णव यांनी गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना सकारात्मक कार्यवाहीचे निर्देश देण्याचे आश्वासन दिले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# महाराष्ट्र पत्रकार संघ आयोजीत मूकनायक व दर्पण दिना निमित्त विविध पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात सपंन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

प्रतिवर्षा प्रमाने गेवराई येथे मूक नायक व दर्पण दिना निमीत् विविध पुरस्कारचे आयोजन करण्यात आले होते हा पुस्कार वितरण सोहळा दिंनाक ३फेब्रुवारी मंगळवार सकाळी आकरा वाजता छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद गेवराई येथे भव्यदिव्य साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष गेवराई येथील चित्तेंश्वर



संस्थानचे मठाधिपती आदरनिय घोगे महाराज होते तर उद्धाटक म्हणुन गेवराई येथील कर्तव्यदक्ष आधिकारी डिवायएसपी श्री अनिल कटके साहेब तर प्रमुख पाहुने म्हणून युवा नेते श्री यशराज भैय्या पंडित प्रा. पिटी चव्हाण प्रा. शिवाजी वराट श्रीकात सानप कांडेकर कैलास माने देवीदास खरात डॉ. चंद्रशेखर गवाही विकास गायकवाड मुघोष मुंढे तुकाराम ततकर विश्वराध सोनवणे

एपीआय तांगडे साहेब सुशील जंजाळ साईनाथ सुरवसे यांच्यामह आनेक मान्यवर उपस्थित होते तर पुरस्कार प्राम मान्यवर श्री मधुकर तोर दर्पण, काही अमान मूकनायक, आशोक दास आदर्श सरपंच श्री खुपबाबासाहेब खोसे आदर्श सरपंच, पवन चव्हाण युवानेता, राजेंद्र कापूरे मा, सैनिक सेवा रत्न, रामनाथ दाभाडे कृषी रत्न डॉ गजानन मस्के आरोग्य सेवा रत्न, सुशिल कोळेकर कला क्षेत्र, डॉ दताञय गुंजाळ आरोग्य सेवा रत्न, श्रीराम गव्हाणे सेवा रत्न, शोऐब सय्यद आरोग्य सेवा, डॉ शिवाजी खेथे आरोग्य सेवा रत्न, मंच्छिद्र बेरे आदर्श सरपंच, घारगे चामन सहकार क्षेत्र, संतोष जेथलिया उद्योग रत्न, काशीनाथ चव्हाण उत्कृष्ट शिल्पकार, गणेश सानप आदर्श शिक्षक, गावडे बाळू आदर्श शिक्षक, धर्मराज आहेर सेवा रत्न, डॉ जीवन राठोड़ आरोग्य सेवा, परमेश्वर साळुंके उत्कृष्ट संपादक, सय्यद एजाज गेवराई भुषन, तर गजानन काळे यांना समाज भुषन पुरस्कार आसे चौवीस विविध पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्सहात सपन्न झाला आहे हा सोहळा छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद गेवराई येथे होता तर या कार्यक्रमाचे आयोजक महाराष्ट्र पत्रकार संघ जिल्हाअध्यक्ष बीड तथा दैनिक संघर्षयोद्धा मुख्य संपादक हंबरे बापुसाहेब यानी आयोजीत केला होता हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शेख खाजाभाई चक्रधर घोडके बड़ चौधरी आकाश कांबळे विलास शिंदे आशोक कांबळे शेख जावेद आर्यन हंबरे साहिल हंबरे गणपत हंबरे निखील हंबरे आजिम पठाण संतोष रासवे बाबासाहेब उपाड़े निलेश गायकवाड़ उमेश कासार सुरेश देवकते इम्रान सौदागर आदिने खुप परिश्रम घेतले तर सुत्रसंचालन आशोक गलांडे सर यांनी केले.

# रामेश्वर विद्यालय, सिंदखेड येथे स्नेहसंमेलन संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

सिंदखेड येथील रामेश्वर विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे सचिव तथा मुख्याध्यापक श्री.संभाजी दादा करांडे हे होते. कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख अतिथी श्री जनार्धन काका करांडे पोलीस पाटील व सरपंच, सिंदखेड,श्री बाळासाहेब राऊत माजी सरपंच, मसला,श्री सर्जेराव ठोसर उपसरपंच, सिंदखेड,श्री शिवनाथ ठोसर(चेअरमन),श्री सतीश सपकाळ भाजपा कार्यकर्ते

श्री डॉ. अशोक धुमाळ सामाजिक कार्यकर्ते,श्री संजय जाधव उपसरपंच, मनमोडी,श्री रमेश देवकर चेअरमन,श्री बाळू वारे उपसरपंच, चिखली वडगाव,श्री मयूरध्वज औटे विमा प्रतिनिधी, वडगाव व सौ. शशिकलाबाई केरबा कांबळे सरपंच, सुशी कवडगाव) हे होते. छत्रपती शिवाजी महाराज व सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री.



जोगदंड सर यांनी केले आपल्या प्रस्ताविकात त्यांनी मराठी शाळांकडे कमी होत चाललेली पटसंख्या, इंग्रजी शाळांची वाढती फी तसेच त्यातून गरीब, शेतकरी व कष्टकरी पालकांची होणारी आर्थिक पिळवणूक या महत्त्वाच्या विषयांवर परखड व विचारप्रवर्तक भूमिका मांडली. मराठी शाळांचे संवर्धन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज त्यांनी अधोरेखित केली.कार्यक्रमादरम्यान द्यार्थ्यांनी देशभक्ती गीत, कोळी गीत,नृत्य, गायन, नाट्यछटा व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

स्नेहसंमेलन कार्यक्रमास उपस्थित असलेले मान्यवर, पालक, प्रतिष्ठित नागरिक, महिला, ग्रामस्थ यांनी विद्यार्थी यांच्या कलागुणांना भरभरून प्रतिसाद दिला व विद्यार्थी यांनी सादर केलेल्या गीतास बक्षिस ही दिले. या स्नेहसंमेलन कार्यक्रमास उपस्थित असणारे गायनकार प्रा. सुनील मुंडे सर यांनी आपल्या सुमधुर गायनातून संपूर्ण कार्यक्रमात रंगत आणली व उपस्थितांची विशेष दाद मिळवली.

या कार्यक्रमास पंचक्रोशीतील नागरिक, पालक, माजी विद्यार्थी तसेच महिला वर्गाची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन कु. वर्षा गुजर, करांडे ज्ञानेश्वरी व मयूरध्वज औटे यांनी प्रभावी केले केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनामुळे विद्यालयात उत्साहाचे व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा, शिक्षणप्रेम जागृत करणारा आणि सामाजिक जाणीव वाढवणारा ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



*बीड : ब्ऱ्हाणपूर गावा मध्ये प्रियांका दिगंबर लांडे. Mpsc मधून महसूल सहाय्यक म्हणून निवड झाल्या बद्दल तिचा सत्कार करण्यात आला आहे. तरी गावातील मान्यवर, कानिफनाथ लांडे, गोरख चांगण, गौरव लांडे, युराज लांडे, समाधान लांडे,ज्ञानोबा घोलप, महादेव लांडे, हनुमान लांडे हे मान्यवर उपस्तिथ राहून पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्या दिल्या.*

## डॉ.निखिल ऋषिकेशी व डॉ.नम्रता गायकवाड यांच्यामुळे १८ महिन्याने डोळ्याची नजर पहिल्यासारखी झाली

**चौसाळा । प्रतिनिधी**

१९ ऑगस्ट २०२४ ला आमचे प्रतिनिधी प्रसाद देशमुख यांचा चौसाळा ते वाशी दरम्यान प्रवास करताना मोटार सायकल अपघात झाला होता या अपघातामध्ये त्यांच्या डोळ्याला इजा झाली होती पुणे येथील अग्रवाल आय हॉस्पिटलमध्ये डॉ. प्रभू देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली १८ महिने उपचार घेण्यात आले डॉ. अमोघ जोशी डॉ. निखिल ऋषिकेशी व डॉ. नम्रता गायकवाड यांच्या अथक परिश्रमाने त्यांच्या डोळ्याचे ऑपरेशन करण्यात आले दोन वेळेस केलेल्या



ऑपरेशन नंतर शेवटी ऋषिकेशी व नम्रता गायकवाड मॅडम यांना यश आले व प्रसाद देशमुख यांची नजर पूर्ववत झाली त्यांच्या या यशस्वी शस्त्रक्रियेबद्दल देशमुख कुटुंबीयांकडून व मित्र परिवाराकडून त्यांच्या सर्वांचे आभार मानण्यात आले त्यांना अग्रवाल आय हॉस्पिटल च्या ज्योती झोरे, आरती बल्हेकर व इतर सर्व स्टाफ यांनी मोलाचे सहकार्य केले त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# पत्रकार बाळासाहेब आडागळे यांचा सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवसाच्या अनावश्यक खर्चाला फाटा देत समाजातील गरजू घटकांना मदत करून आनंद द्विगुणीत करण्याचा एक अनोखा आणि प्रेरणादायी प्रयत्न करण्याचा मानस करित सामाजिक उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याचा निर्धार पत्रकार बाळासाहेब आडागळे यांनी घेतल्याने वाढदिवस केवळ वैयक्तिक आनंद देत नाही तर समाजात एक सकारात्मक संदेश देतो आणि इतरांना मदत करण्यासाठी प्रेरित करतो. या उद्देशाने मूकबधिर शाळेत अन्नदान शाळेत शैक्षणिक वस्तूचे वाटप रुग्णांना फळांचे



वाटप यासह विविध सामाजिक उपक्रमातून पत्रकार बाळासाहेब आडागळे यांचा वाढदिवस माजलगाव येथील पत्रकारांनी व मित्रपरिवार ने साजरा केला. माजलगाव येथील पत्रकार बाळासाहेब आडागळे यांचा वाढदिवस ५ फेब्रुवारी गुरूवार रोजी सत्कार, शाल, केक न कापता गोविंदपुर येथील शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले, माजलगाव येथील मूकबधिर शाळेत विद्यार्थ्यांना खिचडीचे वाटप, ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे फळ वाटप करण्यात आले. पत्रकार बाळासाहेब आडागळे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने माजलगाव येथील नगरसेवक सय्यद रफिक, तलाठी संघटनेचे अध्यक्ष रूपचंद आभारे, ऍड.राम गवते, उपसरपंच शाम पांचाळ, सोनवणे सर पत्रकार परमेश्वर सोळंके, विष्णू उगले, अरविंद ओव्हाळ, पृथ्वीराज निर्मळ, राम यादव,इम्रान शेख या मित्र परिवाराने उपक्रमासाठी परिश्रम घेतला आहे.

**सध्या सर्वत्र धुमधडाक्यात वाढदिवस साज रा करण्याची क्रेझ निर्माण झाली आहे. लहान मुलांपासून ते मोठ्या व्यक्तींपर्यंत सर्वांचेच वाढदिवस अतिशय धुमधडाक्यात केले जात आहेत. यासाठी मोठा खर्च करण्यात येत आहे. अतिरेकी सजावट, फटाके वाजवणे, डिजे असा खर्च करण्याची सध्या चढाओढ निर्माण झाली आहे. मात्र सामाजिक आत्मभान ठेवून सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करणे प्रमाण कमी झाले आहे. माझा प्रत्येक वाढदिवस समाजोपयोगी व्हावा यासाठी मी प्रयत्न करतोय, त्यामुळे माझी आपणा सर्वांना विनंती आहे की, आपण देखील आपला वाढदिवस अश्याच सामाजिक कार्यातून साजरा करावा असे आवाहन पत्रकार बाळासाहेब आडागळे यांनी केले आहे.**

## माता रमाई जयंतीनिमित्त तालुकास्तरी शालेय व महाविद्यालयीन निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### राजलक्ष्मी जाधव प्रथम, मानसी शेरकर द्वितीय, रिया जगतकर तृतीय

**परळी वै. । प्रतिनिधी**

माता रमाई जयंती उत्सव समिती, पंचशील नगर परळी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरी शालेय व महाविद्यालयीन निबंध स्पर्धे ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सामाजिक जाणीव, विचारप्रवर्तक लेखन व अभ्यासपूर्ण मांडणीमुळे ही स्पर्धा विशेष लक्षवेधी ठरली. या स्पर्धेत असंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ही निबंध स्पर्धा मासाहेब जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जीवनकार्य व विचारांवर आधारित घेण्यात आली होती. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी गटसाधन केंद्र, परळी यांनीही मोलाचे सहकार्य केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक राजलक्ष्मी विकास जाधव (माऊंट लिटरा झी स्कूल, परळी) हिने पटकावला. द्वितीय क्रमांक मानसी नवनाथ शेरकर (जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, मोहा) हिने मिळवला, तर तृतीय क्रमांक रिया रावसाहेब जगतकर (कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला (कनिष्ठ) महाविद्यालय, परळी वैजनाथ) हिने पटकावला.

प्रोत्साहनपर बक्षिसे प्रतिज्ञा बाबासाहेब रोडे (मिलिंद ज्युनिअर महाविद्यालय, परळी), आर्वी आशिष आरगडे (संस्कार प्राथमिक शाळा, परळी) आणि गीता रामकिशन तिडके (जिल्हा परिषद शाळा, लाडझरी) यांना जाहीर करण्यात आली आहेत.

**रोख बक्षीसे व प्रमाणपत्र व पेन**

**स्पर्धेतील प्रथम बक्षीस ५,००० रुपये, द्वितीय बक्षीस ३,००० रुपये व तृतीय बक्षीस २,००० रुपये असून ही बक्षिसे मुफ्टा शिक्षक संघटना जिल्हा कार्याध्यक्ष भैय्यासाहेब आदोडे यांच्यातर्फे देण्यात येणार आहेत. तसेच प्रोत्साहनपर तीन बक्षिसे प्रत्येकी १,००० रुपये सचिन रणखांबे यांच्यातर्फे दिली जाणार आहेत. सहभागी सर्व स्पर्धकांना पेन व प्रमाणपत्र प्रा.डॉ.विनोद जगतकर यांच्यातर्फे प्रदान करण्यात येणार आहे. माता रमाई यांच्या विचारांचा प्रसार व विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेली ही स्पर्धा अत्यंत यशस्वी ठरल्याची प्रतिक्रिया उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. स्पर्धे तील विजेत्यांना बक्षीस वितरण समारंभ दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता पंचशील नगर येथील वैशाली बौद्ध विहार येथे मान्यवरांच्या हस्ते पार पडणार आहे.**

# देशाला फलोत्पादनाची राजधानी बनवू शकणाऱ्या मयंक गांधींच्या सूचना केंद्र शासनासमोर ठेवणार

## नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद यांची ग्वाही ; दोन दिवसीय कृषीकुल दौरा




**परळी वै. । प्रतिनिधी**

आपल्या देशाला महासत्ता करायचे असेल तर देशाचे शेतकरी आर्थिक सक्षम व्हावे लागतील. कृषिप्रधान आपल्या देशातील एकूण क्षेत्रापैकी केवळ १५% एवढीच फळबाग लागवड केली जाते. उत्तम दर्जाचे फळे देशातून निर्यात झाली पाहिजेत, शेतकऱ्यांना फळबाग लागवडीतून भरघोस आर्थिक उत्पन्न झाले पाहिजे. हा देश फळबाग लागवडीची राजधानी व्हावा हे जलनायक मयंक गांधी यांचे स्वप्न आहे. ते त्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने ग्लोबल विकास ट्रस्टचे चालेले कामकाज अतिशय उत्तम दर्जाचे आहे. ऋतढ चे हे मॉडेल देशासाठी उपयुक्त असून, देशाला फलोत्पादनाची राजधानी करण्याच्या दृष्टीने सर्व उपाययोजना केंद्र शासनाच्या नियोजनात ठेऊ असे आश्वासन देशाच्या नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद यांनी दिले. ते कृषीकुल येथील महत्त्वपूर्ण नियोजन बैठकीत बोलत होते. देशाच्या नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद हे दोन दिवसीय परळी वैजनाथ दौऱ्यावर आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल या आंतरराष्ट्रीय शेतकरी प्रशिक्षण केंद्र येथे फलोत्पादक शेतकरी, त्यांच्यासमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना यासंदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीस नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद, ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, ट्रस्टी संजय परमार, डॉ.हरिश्चंद्र वगे, माजी निवृत्त सनदी अधिकारी सुधी मोहंती, विवेक भारती, एकल फाउंडेशनचे दिवाकर झरबडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या अतिशय महत्त्वपूर्ण बैठकीत केंद्र शासनाच्या धोरणातील शेतकऱ्यांविषयीच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. मराठवाडा हा सर्वाधिक दुष्काळी भाग आहे. कापूस आणि सोयाबीन ही पारंपरिक पिकांना फाटा देत आता मोठ्या प्रमाणावर शेतकरी फळबाग लागवड करत आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टकडून शेतकऱ्यांना प्रशिक्षण, अल्प दरात लागवडीसाठी रोपे आणि काढणी नंतर बाजारपेठेची उपलब्धतात याविषयी मार्गदर्शन करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचा निवृत्त सेवा पुरस्कार इंजि.आर.व्ही.वजूरकर आणि विजयकुमार सर्वज्ञ यांना प्रदान

**बीड । प्रतिनिधी**

येथील सिनीयर सिटीझन ॲण्ड पेन्शनर्स असोशिएशनचे बीड जिल्हाध्यक्ष इंजि.आर. व्ही. वजूरकर आणि सचिव विजयकुमार सर्वज्ञ यांना महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनच्यावतीने सन २०२४-२५ चा निवृत्त सेवा पुरस्कार श्रीक्षेत्र नरसी नामदेव जि.हिंगोली येथे आयोजित कार्यक्रमात दि.३ फेब्रुवारी २०२६ रोजी विभागीय आयुक्त श्री.जितेंद्र पापळकर, संघटनेचे राज्याध्यक्ष एन.डी.मारणे व मान्यवरांच्या यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



सिनीयर सिटीझन ॲण्ड पेन्शनर्स असोशिएशन बीड यांच्या मार्फत पेन्शनर्सच्या कार्यालयीन अडी-अडचणी इतर थकीत देयके आणि दर वर्षी पेन्शनर्स अदालत तसेच पेन्शनर्स डे चा कार्यक्रम आयोजित केला जातो. तसेच पेन्शनर्ससाठी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करणे या व महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे सभासद, नोंदणी मोठ्या प्रमाणात केल्यामुळे या कामाची दखल घेवून महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचा निवृत्त सेवा पुरस्कार इंजि.आर. व्ही.वजूरकर आणि विजयकुमार सर्वज्ञ यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल वजूरकर व सर्वज्ञ यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

**जाहीरनामा**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज, जि.बीड**
**एम ए जी विभाग**
ई मेल – KAIJTAHSILDAR@GMAIL.COM
दुरध्वनी क्र. ०२२४५-२५२६४५
क्रं.२०२५/एमएजी /कावि/ ४२
दिनांक: ०२९.०२:२०२५

सर्व जनता मौजे विडा ता. केज यांना जाहीर केले जाते की, विडा येथील जन्म पावलेला **इसम नामे घुटे रणजीत निवृत्तीराव याचा स्वत:चा जन्म दिनांक ०१/०६/१९७० रोजी मौजे विडा ता. केज** येथे झालेला असुन व जन्म नोंद आदेश ग्राम पंचायत विडा यांना देणे बाबत घुटे रणजीत निवृत्तीराव रा. विडा ता. केज जि. बीड यांनी स्वत: या कार्यालयास दि.३१.१२.२०२५ रोजी अर्ज सादर करुन सोबत ग्राम पंचायत विडा यांचे जन्म नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व नोटरी करुन शपथपत्र सादर करुन ग्राम पंचायत विडा ता. केज यांना त्यांच्या स्वत:ची जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.

२/- घुटे रणजीत निवृत्तीराव याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पंचायत कार्यालय विडा ता. केज यांना जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरीत)
शिक्का
कार्यकारी दंडाधिकारी, केज

**जाहीर प्रगटन**

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**
**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहू नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**
जावक क्र.१४
दिनांक. ०२/३/२०२५
तक्रार क्रमांक : ३२७/२०२३

**अर्जदारः-१. सुनंदा भाऊसाहेब परसे २. भाऊसाहेब पांडुरंग परसे**
विरुध्द

गैरअर्जदार :- २. अश्विनी सुनिल वांढर, मुख्यप्रबंधक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, राजीव गांधी चौक, ता. बीड, जि. बीड. रा.विप्र नगर, ब्राम्हणवाडी, बीड ता. जि. बीड रा. राजीव गांधी चौक, ता.बीड, जि. बीड. ५. बबन विश्वनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, राजीव गांधी चौक, ता. बीड, जि. बीड. रा. राजीव गांधी चौक, ता. बीड, जि. बीड.

वर नमुद तक्रारदार यांना विरुद्ध पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २६/३/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.
दिनांक - ०२/०१/२०२५
ठिकाण - बीड
(स्वाक्षरीत)
प्रबंधक
शिक्का
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. ०७ फेब्रुवारी २०२६ ●

# येडेश्वरी कारखाना परिसरात अजित दादांचे भव्य स्मारक उभारणार

## खा.बजरंग सोनवणे यांची घोषणा ; जिल्ह्याची सिस्टीम बदलण्यासाठी दादाच पालकमंत्री हवे होते

केज । प्रतिनिधी

येडेश्वरी साखर कारखाना परिसरात दिवंगत लोकनेते अजित पवार यांचे भव्य व दिव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची घोषणा बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केली. येडेश्वरी साखर कारखाना येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते माध्यमांशी बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादीचे नेते ज्ञानेश्वर चौरे, अमर देशमूख यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, अजित दादा हे माझे राजकीय वडील होते. १९९२ पासून त्यांच्याशी माझा संबंध आला आणि १९९९ पासून माझी राजकीय घडण सुरू झाली. माझ्या संपूर्ण राजकीय प्रवासात दादांचे मोलाचे योगदान असून, त्यांच्या जाण्याने राजकीय छत्र हरपले आहे. देशासह महाराष्ट्राची मोठी हानी त्यांच्या जाण्याने झाली असून, त्यांची पोकळी कधीही भरून निघू शकणार नाही, अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. येडेश्वरी साखर कारखाना उभारण्यात अजित पवार यांचा मोठा वाटा असल्याचे नमूद करत, त्यांच्या स्मरणार्थ कारखान्याच्या प्रांगणात स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सोनवणे यांनी सांगितले. या स्मारकासाठी २१ सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली असून, आपण स्वत: त्या समितीचे सदस्य असणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या कारखान्यात सध्या सुमारे १८०० कर्मचारी, जवळपास ७ हजार कामगार कार्यरत असून, त्यांच्या सहभागातून हे स्मारक उभारण्यात येणार आहे. पुढील एक वर्षाच्या आत स्मारक पूर्ण करून प्रथम पुण्यतिथीच्या कालावधीत

▶▶ उर्वरित पान २ वर



### ● हायस्पीड रेल्वेसाठी प्रयत्नशील

रेल्वे विकासाबाबत बोलताना, बीड जिल्ह्यात रेल्वेचे जाळे वाढवून परळीपर्यंत हायस्पीड रेल्वे आणण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. हे अजित पवार यांचेही स्वप्न होते; ते असते तर हे काम अधिक लवकर झाले असते, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

### ● विलीनीकरणावर योग्यवेळी बोलू

दोन राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांवर बोलताना, सध्या यावर बोलणे योग्य नसल्याचे सांगत, योग्य वेळ आल्यावर आपली भूमिका स्पष्ट करू, असे त्यांनी सूचक विधान केले. दादांच्या निधनाचे दु:ख मनातून असल्याने दहा दिवसांचा दुखवटा पाळला असून, याच कारणामुळे अर्थसंकल्पावरही भाष्य केले नसल्याचे त्यांनी सांगितले.

### ● विमान अपघाताची चौकशी व्हावी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत संशय व्यक्त करत, या घटनेची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे खा.सोनवणे यांनी सांगितले. विमानतळापासून ते अपघातस्थळापर्यंतचे सर्व सीसीटीव्ही फुटेज जनतेसमोर यावे, तसेच या प्रकरणाची रॉ मार्फत चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली.

### ● सिस्टीम बदलण्यासाठी दादा आवश्यक होते

जरांगे पाटील यांना धमकी देणाऱ्या कॉल रेकॉर्डिंग प्रकरणावर प्रतिक्रिया देताना, हे नीच प्रवृत्तीचे कृत्य असून पाटील हे समाजाच्या हितासाठी काम करणारे पूजनीय व्यक्तिमत्त्व असल्याचे सोनवणे यांनी स्पष्ट केले.बीड जिल्ह्यातील कायदा–सुव्यवस्थेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, जिल्ह्याची सिस्टीम बदलण्यासाठी अजित पवार यांना किमान आणखी दोन वर्षे पालकमंत्री म्हणून राहणे आवश्यक होतड़आजही गुंडगिरी पूर्णपणे कमी झालेली नाही; एखाद–दुसरा अधिकारी बदलून जिल्हा सुधारत नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

# सरपंच पतीने दिली गावाकऱ्यांना धमकी

## माझं बिल निघेपर्यंत गावाला पाणी नाही ; ग्रामसभेत सरपंच पतीचे वादग्रस्त विधान



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अंतरवन पिंपरी तांडा (ता.बीड जि.बीड) जलजीवन मिशन अंतर्गत अंतरवन पिंपरी तांडा गावासाठी १ कोटी १४ लाख रुपये खर्चाची पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती. ही योजना सुमारे पाच महिन्यांपूर्वी पूर्ण झाली असतानाही गावकऱ्यांना अद्याप नियमित पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. याचे कारण म्हणजे सरपंच पतीने घेतलेला वादग्रस्त आणि आक्षेपार्ह पवित्रा.

जोपर्यंत माझे बिल निघत नाही, तोपर्यंत गावाला पाणी देणार नाही, अशी उघड धमकी सरपंच पतीने ग्रामसभेत दिल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. ग्रामसभेदरम्यान सरपंच पतीचे वादग्रस्त विधान. माझे पैसे निघाले नाहीत तर मी पाणी सोडणार नाही. गावाला प्यायला द्यायचे असेल तर द्या, असे म्हणत उपस्थित ग्रामस्थांना धमकावल्याचे सांगितले जाते. या वक्तव्यामुळे ग्रामसभेत प्रचंड संतापाची लाट उसळली. कोट्यवधी रुपये खर्च करून तयार झालेली पाणीपुरवठा योजना वैयक्तिक आर्थिक वादामुळे अडवून ठेवणे हे लोकशाही मूल्यांना व प्रशासनाला थेट आव्हान असल्याची भावना ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकाराबाबत जिल्हा प्रशासन,

▶▶ उर्वरित पान २ वर

# तलाव भरलेला, तरी पाटोदा तहानलेला ; शहरातील नागरिकांना नगरपंचायतच्या बेजबाबदार पणामुळे पंधरा दिवसांला पाणी – निलाताई पोकळे

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी मतदार संघातील पाटोदा शहराला पाणीपुरवठा करणार्या तलावात मुबलक पाणी साठा असतानाही पाटोदा नगरपंचायच्या गलथान कारभारामुळे शहराला पंधरा दिवसांला एकदाच पाणीपुरवठा करत असून नागरिकांची उघडपणे आडवणूक केली जात आहे. तळ्यात पाणी उपलब्ध असताना



पाण्यासाठी नागरिकांना भटकावे लागत असल्याने नगरपंचायतीच्या बेजबाबदार

▶ उर्वरित पान २ वर

# दिवसा घरफोडी करणाऱ्या अट्टल गुन्हेगारास ठोकल्या बेड्या; स्थानिक गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात मागील काही महिन्यात चोरी,घरफोडी तसेच चैनच्या प्रमाणात वाढ झाली असून यावर बीड पोलिसांनी चोरावर कारवाइचा फास आवळला आहे.


दिवसा घरफोडी करणाऱ्या अट्टल व सराईत गुन्हेगारास अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. पोलीस ठाणे पिंपळनेर हद्दीतील मौजे कुकुडगाव, ता. जि. बीड येथे घडलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा पर्दाफाश करण्यात आला आहे. दि. १२ जानेवारी २०२६ रोजी कुकुडगाव येथील रहिवासी इंदरराव रामभाऊ नवले हे आपल्या राहत्या घराला कुलूप लावून बाजारासाठी बाहेर



गेले असता अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून घरातील रोख रक्कम चोरून नेली होती. या प्रकरणी पोलीस ठाणे पिंपळनेर येथे घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता.

▶ उर्वरित पान २ वर

# सहयोग नगरच्या संत श्री गजानन महाराज मंदिरात प्रगट दिनानिमित्त धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल





बीड । प्रतिनिधी

शहरातील सहयोग नगर भागामध्ये असलेल्या संत श्री गजानन महाराज मंदिरात प्रगट दिनानिमित्त सोमवार दि. २ फेब्रुवारीपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिराचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असल्यामुळे दररोज भक्तिमय वातावरणात बहारदार कार्यक्रम पार पडत असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निमित्ताने गजानन महाराज पारायण सोहळा, भजन–कीर्तन, नामस्मरण, हळदीकुंकू कार्यक्रम, तसेच विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भक्तांच्या वतीने अन्नदान सेवा राबविण्यात येत असून मोठ्या संख्येने भाविक प्रसादाचा

▶ उर्वरित पान २ वर

# अनिलदादांच्या चंपावती महोत्सवाची महाराष्ट्राला भुरळ पडली- मनोज शिंदे

## कलाक्षेत्राच्या समृद्धीसाठी चंपावती महोत्सव अविरत सुरु राहील: अनिलदादा जगताप







बीड । प्रतिनिधी

बीडमधील बाल कलाकारांच्या प्रतिभेला समर्पित असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक या भव्य सांस्कृतिक उपक्रमाची दखल थेट महाराष्ट्र पातळीवर घेतली जात असून, या महोत्सवाने अवघ्या राज्याला भुरळ पाडल्याचे गौरवोद्गार शिवसेना संपर्कप्रमुख मा. मनोजजी शिंदे साहेब यांनी काढले. बीडच्या चंपावती रंगमंचावर काल दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी ठाणे (मुंबई) येथून खास उपस्थित राहून मा. मनोजजी शिंदे साहेबांनी समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य व एकपात्री अभिनय या स्पर्धांचे शुभहस्ते उद्घाटन केले. यावेळी त्यांनी बीडच्या बाल कलाकारांच्या कलागुणांचे भरभरून कौतुक केले.

या प्रसंगी शिवसेनेच्या उपनेत्या संगीताताई ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, चंद्रकांत नवले, दै. संकेतचे संपादक नरेंद्र कांक्रिया, दै. लोकमतचे सोमनाथ खताळ, दै. दिव्य मराठीचे अमोल मुळे, दै. आरंभचे संपादक दीपक थोरात, दै. बीड प्रसारचे समीर काझी, दै. बीडसत्ताचे कृष्णा म्हेत्रे, माजी नगरसेवक संजय होळकर, वकील संघाचे जिल्हाध्यक्ष सुभाष पिसुरे, व्यापारी मंगेश लोळगे, सतीश शेळके आदी मान्यवरांची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा शिवसेनेकडून राबविण्यात येणारा हा सांस्कृतिक उपक्रम कलाक्षेत्रासाठी अत्यंत स्तुत्य असल्याचे मत मनोज शिंदे यांनी व्यक्त केले. बाल कलाकारांमागे मेहनत घेणाऱ्या शाळा व शिक्षकांचेही त्यांनी विशेष कौतुक केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीडच्या कलाक्षेत्राच्या समृद्धीसाठी चंपावती महोत्सव अविरत

▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### पो.नि.अशोक मुदिराज यांची तडकाफडकी बदली

**तीन महिन्यातच बदली केल्याने शहरात चर्चेला उधाण**



बीड । प्रतिनिधी

बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांची आज दिनांक ७ फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी तडकाफडकी बदली केली आहे. त्यांची बदली थेट पोलीस कंट्रोल रूम येथे करण्यात आल्याने पोलीस दलासह बीड शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. बीड नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यापूर्वी बीड पोलीस दलात मोठ्या प्रमाणावर खांदेपालट करण्यात आली होती. मात्र, केवळ तीन महिन्यांच्या आतच पो.नि. अशोक मुदिराज यांची बदली करण्यात आल्याने या निर्णयामागील नेमके कारण काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून बीड ग्रामीण पोलीस ठाणे वादग्रस्त ठरत असून, या हद्दीत अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. विशेष म्हणजे ग्रामीण पोलीस ठाण्यातीलच काही अधिकारी या अवैध धंद्यांना अप्रत्यक्ष पाठबळ देत असल्याची माहितीही समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर पो.नि. अशोक मुदिराज यांची तडकाफडकी बदली ही कारवाई आहे की प्रशासकीय निर्णय, याबाबत सध्या तरी पोलीस प्रशासनाकडून अधिकृत खुलासा करण्यात आलेला नाही. मात्र या घटनेमुळे बीड शहरात राजकीय व प्रशासकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

### बिगरव्यावसायीक व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

जिल्हयातील इमाव ओबीसी,विमाप्र,एसबीसी आणि विजाभज व्हीजीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता १२ वी नंतरच्या उच्चशिक्षणासाठी बिगरव्यावसायीक/ व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाळ स्वयंम योजना भटक्या जमाती क- प्रवर्गासाठी अर्ज सादर करण्याची मुदत २६.१०.२०२५ पर्यंत देण्यात आली होती. या योजनांना मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता सदर योजनांना १२ वी नंतरच्या उच्चशिक्षणासाठी बिगरव्यावसायीक व्यावसायिक अभ्यासक्रमास दि. ६ फेब्रुवारी २०२६ पासून दि. १५ फेब्रुवारी पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी विद्यार्थ्यांनी https///hmas.mahait.org या पोर्टलवर वर ऑनलाईन अर्ज करुन योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन इतर मागास बहूजन कल्यानचे सहाय्यक संचालक यांनी केले आहे. बीड नगरपरिषद हद्दीपासून १० कि.मी. अंतरामधील कॉलेजच्या खींशरी डायरेक्ट, २ पव धशरी ला डमीशन असलेल्या विद्यार्थ्यांनी फक्त वसतीगृह योजनेसाठी अर्जकरावा. बीड तालुक्या व्यतिरिक्त बाकी तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांनी फक्त आधार व स्वयंत योजनेसाठी अर्ज करावा.

### विविध पुरस्कारासाठी अर्ज सादर आमंत्रित

बीड । प्रतिनिधी

इतर मागास बहुजन विभागामार्फत राबविण्यात येणा-या महात्मा बसवेश्वर सामाजिक समता- शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार व क्रंतीवीर उमाजी नाईक पुरस्कार सन २०२५- २६ साठी पुरस्कारासाठी पात्र इच्छुक व्यक्ती तसेच संबंधित समाजाच्या उत्थानासाठी उल्लेखनिय कार्य करणा-या संस्था यांनी दि. ५ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पुरस्कारासाठी प्रस्ताव सहाय्यक संचालक, इतरमागास बहूजन कल्याण बीड येथे कार्यालयीन वेळेत रितसर सादर करावे. अर्जाचा नमूना शासन निर्णयातील सविस्तर अटी व शर्ती तसेच अधिक माहितीसाठी सहाय्यक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण बीड येथे कार्याजयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन इत्तर मागास बहूजन कल्याणचे सहाय्यक संचालक यांनी केले आहे.


### लिंबारुई येथे सोमवार पासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



नवगण राजुरी । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान लिंबारुई येथे शिवस्वरूप संत श्री नारायणदेव बाबा वाकीकर यांच्या कृपाशीर्वादाने शिवउपासक बालयोगी श्री संत भगवान बाबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ९ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ७ विष्णूसहस्रनाम, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी १ ते ४ संगीत शिवकथा, सायंकाळी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकीर्तन होणार असून या सप्ताहाचा आरंभ श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या हस्ते विना पूजनाने होईल. या सप्ताहात ह.भ.प. धर्मगुरू अमृताश्रम स्वामी महाराज, ह.भ.प. विशाल महाराज करांडे, ह.भ.प. महंत सुरेशानंदजी महाराज शास्त्री, ह.भ.प. तुकाराम महाराज शास्त्री, ह.भ.प. अशोक महाराज, ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर, ह.भ.प. केशव महाराज भगत यांचे कीर्तन होणार आहे. या सप्ताहाची सांगता ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज धायगुडे यांचे सोमवार दि.१६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होणार असून या सप्ताहाच्या सात दिवसात रुद्र स्वाहाकार महायज्ञ सकाळी ८ ते ११ या वेळेत होणार असून पुरोहित मिथुन देवा निर्मळ हे असणार आहेत. रविवार दि.१५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कलश रोहनचा कार्यक्रम होणार आहे. तरी या सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी लिंबारुई यांनी केले आहे.

### श्रीमती. अर्चना अरुण कुलकर्णी यांचे निधन



बीड । प्रतिनिधी

बीड येथील रहिवाशी श्रीमती. अर्चना अरुण कुलकर्णी यांचे दिनांक ०४/०२/२०२६ रोजी बीड येथे राहत्या घरी अभ्युदय निवास गुरुकृपा गृहनिर्माण संस्था नवगण कॉलेज रोड बीड येथे अकस्मिक निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ७२ वर्षाचे होते. दी.बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बीड मुख्य कार्यकारी अधिकारी कै.अरुण नरहरराव कुलकर्णी यांच्या पत्नी व डॉ.अजय अरुणराव कुलकर्णी यांच्या आई होत्या मृत्यूनंतर त्यांचे पश्चात सून, नातवंडे, दीर, जाऊ असा परीवार आहे.